रे.दि.मु.नं.३७/२०१८
नि.क्र.६० लगत

**<u>वादीचा उर्वरीत उलटतपास प्रतिवादींतर्फे वकील श्री. व्ही. व्ही. पावसकर यांचेकडुन शपथेवर सुरू</u> -**

**३२.** माझ्या भावाचे नाव अमोल सुभाष लाडसावंगीकर असे आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझा भाऊ आणि मी एकत्र वाढलो. हे म्हणणे खरे आहे की, माझा भाऊ आणि मी पारीजात या बंगल्यात एकत्र राहतो. हे मला माहिती नाही की माझ्या भावाची क्रिव्हेटीव इंडस्टीज नावाची २००० सालापासून फर्म होती. हे म्हणणे खरे आहे की, युनीव्हन कंपनीपूर्वी मी ए. एस. पी. नावाच्या कंपनीमध्ये काम करायचो. हे मला आठवत नाही की मी कोणत्या वर्षी ए. एस. पी. कंपनीत काम करायचो. हे मला आठवत नाही की, २००८ मध्ये मी ए. एस. पी. कंपनीत काम करायचो.

**३३.** माझा महिन्याचा पगार स्वत:च्याच बॅक खात्यामध्ये जमा व्हायचा. हे म्हणणे खरे आहे की, माझे एच. डी. एफ. सी. बॅंकेत अकाऊंट आहे. हे मला आठवत नाही की, माझा खाते क्रमांक ०४३०१०६०००३२७३ असा आहे. हे म्हणणे खरे आहे की, दि. २९/०५/२०१८ रोजी माझ्या विरूध्द रिकव्हरी वॉरंट असल्याने रत्नागिरी ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस आले होते. हे मला आठवत नाही की, मी पोलीसांना माझ्या सहीने एच. डी. एफ. सी. बॅंकेचा ५,४७,५००/- रूपयाचा धनादेश क्रमांक ४७८४७९ हा दिला होता.

**३४.** मला मी शिपवरून कधी आलो ती तारीख आठवत नाही. मला मी किती महिन्यापूर्वी आलो हे आठवत नाही. हे मला आठवत नाही की, दि.१९/०६/२०२४ रोजी मी रत्नागिरी की मुंबईमध्ये होतो. पारीजात घराव्यतीरिक्त नागपूर येथे माझी सदनिका आहे. हे मला आठवत नाही की ती सदनिका ४७,८०,८००/- रूपये

मोबदल्यात मी विकत घेतली.

**३५.** मी माझ्या विरूध्द निघालेल्या रिकव्हरी वॉरंटविषयी माझ्या वकीलांना कल्पना दिली होती. माझे विधीज्ञ ॲड. विनोद जोशी होते. हे म्हणणे खरे आहे की, आज रोजी माझ्या विरूध्द दाखल कौटुंबिक हिंसाचाराच्या प्रकरणामध्ये औरंगाबादच्या महिला वकील ॲड. उज्वल अगरवाल आहेत. मला माझ्या विरूध्द निघालेल्या डिस्ट्रेज वॉरंटविषयी कल्पना मिळालेली नाही.

**३६.** हे मला आठवत नाही की ए. एस. पी. कंपनीमध्ये काम करताना मला दरमहा ५,१४,८००/- रूपये इतका पगार मुख्य अधिकारी म्हणून होता. हे मला आठवत नाही की, युनीव्हन कंपनीमध्ये मला ५,३४,६००/- रूपये इतका पगार होता. हे म्हणणे खरे आहे की, माझ्यावर अवलंबून असणा-या लोकांमध्ये श्रध्दा लाडसावंगीकर व माझे आईवडील येतात. साक्षीदार सांगतो की, सोहम लाडसावंगीकर अस्तीत्वातच नसल्याने तो माझ्यावर अवलंबून नाही.

**(प्रतिवादीच्या वकीलांनी कागदपत्रे हजर करण्याच्या कारणास्तव उलटतपास तहकुब करण्याची विनंती केली. विनंती मान्य करण्यात आली. उलटतपास पुढील तारेखपर्यत तहकुब करण्यात आला).**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,**

**सही/-**

**(श्रुती ह.पाटील)**
**सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर**
**देवरुख**

**दि. २१/०८/२०२४**